



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १४४ * नांदेड * शनिवार, दि. ३१ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# 'पाकिस्तान आता ४-५ वर्ष युद्ध लढू शकणार नाही', अमित शाहांचा हल्लाबोल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– अमित शाह यांनी सीमा सुरक्षा दलाच्या महासंचालकांकडून मिळालेल्या अहवालाचा उल्लेख करत म्हटले, भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानच्या चौक्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांची देखरेख करण्याची व्यवस्था उद्धवस्त झाली आहे. ही व्यवस्था पुन्हा उभारण्यासाठी पाकिस्तानला ४ ते ५ वर्षांचा काळ लागू शकतो. ते आता दीर्घकाळ पूर्ण माहिती नसलेले युद्ध लढू शकत नाहीत. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले. याठिकाणी घरांची पडझड तर झालीच शिवाय मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही झाली. केंद्रीय



गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी या भागाचा दौरा करत नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी पाकिस्तानवर हल्लाबोल केला.

यावेळी पुढे बोलताना अमित शाह म्हणाले की, भारताने केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानच्या सीमेवरील अनेक चौक्या उद्धवस्त झाल्या आहेत. यापुढे पाकिस्तान पूर्ण माहिती असलेले युद्ध अधिक काळ लढू शकणार नाही. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवस जम्मूच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त नागरिकांसह सीमा सुरक्षा दलाला संबोधित केले. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारताच्या निवासी भागांवर हल्ला केला. तेव्हा जम्मू फ्रंटियरमधील बीएसएफने पाकिस्तानच्या ११८ हून अधिक चौक्या उध्वस्त केल्या, असेही अमित शाह म्हणाले. ते पुढे म्हणाले, फक्त तीन दिवसांत इतक्या मोठ्या संख्येने चौक्या पूर्णपणे नष्ट करणे किंवा त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणे, हे खूप मोठी गोष्ट आहे, असेही ते म्हणाले.

## फटाक्याच्या कारखान्यात स्फोट, पाच जण ठार

**चंदिगड (प्रतिनिधी)**– पंजाबमधील श्री मुक्तसर साहिब जिल्ह्यातील एका गावात शुक्रवारी सकाळी फटाका कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झाला आणि वीस जण जखमी झाले. ही घटना सिंगावाली-कोटली मार्गावरील दोन मजली काखान्यात घडली. स्फोटामुळे कारखान्याची दोन म जली इमारत कोसळली. फटाका हाताळणीत हयगय झाल्यामुळे स्फोट झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पण स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही. फटाका कारखान्यातील स्फोटात जखमी झालेल्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांचे शवविच्छेदन केल्यानंर मृतदेह नातलगांच्या ताब्यात दिले गेले.

# देशभरात कोरोनाने पुन्हा चिंता वाढवली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**–देशात पुन्हा एकदा हळूहळू कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे, देशात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या १००० पेक्षा जास्त झाली आहे.

राजधानी दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, कर्नाटक, केरळ या राज्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. ताज्या आकडेवारीनुसार दिल्ली एनसीआरमध्ये कोरोनाबाधितांची संख्या १०४ वर पोहोचली आहे. गुरुग्राममध्ये शुक्रवारी नव्या तीन रुग्णांची नोंद झाली. गेल्या दहा दिवसांमध्ये शहरात १६ नव्या कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची नोंद झाली आहे.

राजधानी दिल्लीमध्ये कोरोनाच्या रुग्णांची संख्या सातत्यानं वाढत आहे, यासंदर्भात माहिती देताना मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी म्हटलं आहे की, दिल्लीमध्ये कोरोना रुग्णाची संख्या वाढत आहे, मात्र काळजी करण्याचं काही कारण नाही, रुग्णालय आणि सरकार अलर्ट मोडवर आहेत. सध्या स्थितीमध्ये दिल्लीत १९ कोरोनाबाधित रुग्णांचा उपचार रुग्णालयात सुरू आहे, तर बाकी सर्व रुग्णांना घरीच क्वॉरंटाईन करण्यात आलं आहे. जरी रुग्ण काही प्रमाणात वाढत असेल तरी चिंता करण्याचं कारण नाही, कारण अजूनही परिस्थिती नियंत्रणात आहे. गेल्या आठवड्यात २४ रुग्ण उपचार घेऊन कोरोनामुक्त झाले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर औषधं, ऑक्सिजनचा पुरवठा आणि इतर सुविधा तयार ठेवण्यात आल्याची माहिती यावेळी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. दुसरीकडे कर्नाटक राज्यात देखील कोरोनाबाधितांची संख्या वाढत असल्याचं दिसून येत आहे. राज्यात कोरोनाबाधितांचा आकडा १२६ वर पोहोचला आहे, तर एका वृद्ध व्यक्तीचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. कर्नाटकच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाकडून देखील या वृत्ताला दुजोरा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात देखील कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत आहे.




# मुंबईने गुजरातला नमविले!

**मुंबई (प्रतिनिधी)**– आयपीएल २०२५ मध्ये चांगली सुरुवात करणाऱ्या गुजरात टायटन्सला आयपीएल २०२५ च्या एलिमिनेटर सामन्यात मुंबई इंडियन्सकडून पराभवाचा सामना करावा लागला. यासह गुजरात टायटन्सचा प्रवास संपला आहे. तर पाच वेळा विजेत्या मुंबई इंडियन्सने सहाव्या विजेतेपदाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सने एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सचा २० धावांनी पराभव केला आणि दुसऱ्या क्वालिफायरमध्ये प्रवेश केला. पहिल्यांदा खेळताना मुंबई इंडियन्सची सुरुवात एकदम तुफानी झाली होती. आता क्वालिफायर-२ मध्ये पंजाबशी भिडणार आहे.

# अमराबाद तांडा येथे अन्नातून ९ जणांना विषबाधा

## नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील अमराबाद तांडा येथे भात खाल्ल्याने ९ जणांना विषबाधा झाली आहे. विषबाधा झालेल्यांमध्ये लहान मुलांचा देखील समावेश आहे. सर्वांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

आमराबाद तांडा येथे दि.२८ मे रोजी येथील काही जणांनी शिजवलेला भात फोडणी देऊन सकाळी खाल्ला. भात खाल्ल्यानंतर काही वेळातच नागरिकांना मळमळ होऊ लागले. काहींना उलटी, तसेच पोटदुःखीचा त्रास सुरू झाला. यापैकी अनेकांनी बारड अर्धापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी धाव घेतली. औषधी घेऊन घरी परतले, पण तब्येतीत कुठलाही फरक न पडल्याने त्यांनी गुरुवारी रात्री आरोग्य विभागाच्या १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधून नांदेड विष्णुपुरी येथील शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय गाठले.

विषबाधा झालेल्यांमध्ये राजू गुलाब पवार (वय ४०), संजय गुलाब पवार (वय ४२), स्वीटी राजू पवार (वय ११), धनश्री संजय पवार (वय ११), वंश राजू पवार (वय ५), वैष्णवी संजय पवार (वय १२), सुजाता संजय पवार (वय ३५), पूर्वी राजू पवार (वय १३), उषा राजू पवार (वय ३१) आदी रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ग्रामस्वच्छतेचा नवा मंत्र!

देशभरात स्वच्छ भारत अभियानाची मोठी चर्चा झाली, पण त्याचा खरा आत्मा आजही गावागावांतून फुलताना दिसतो. शौचालयांची संख्या, कचरा व्यवस्थापनासाठी उभारलेली यंत्रणा, आणि अधिकृत आकडेवारी या सगळ्याच्या पलीकडेही काहीतरी अधिक घडतंय, काहीतरी असं जे 'नीतीपत्रांच्या' भाषेपेक्षा अधिक प्रभावी आहे. ते म्हणजे 'स्थानिक समस्या, स्थानिक उत्तरं' या तत्त्वा- वर आधारलेली ग्रामस्थांची आणि स्थानिक नेतृत्त्वाची प्रत्यक्ष कृती. भारताने ७७ टक्के गावांना उघड्यावर शौच न करणे नव्हे, घन आणि सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता, जनजागृती आणि सहभाग या सगळ्याच बाबींत कृती करणे आवश्यक आहे. हरियाणातील करनाल जिल्ह्यातील सुमन डांगी यांनी सुरू केलेली प्लास्टिक दे, जेवण घे, ही योजना त्या दृष्टिकोनाची सुंदर झलक देते. दर ५०० ग्रॅम स्वच्छ आणि पुन्हा वापरता येणाऱ्या प्लास्टिकच्या बदल्यात गरजू लोकांना गरम जेवण दिलं जातं. त्यांच्या स्वयं-साहायता गटाने केवळ ५० हजार रुपयांच्या कर्जातून सुरुवात केली, आणि आतापर्यंत १५०० किलोहून अधिक प्लास्टिक गोळा करत ३ हजारांहून अधिक जेवण दिली आहेत. ही योजना भुकेवर आणि प्लास्टिक कचऱ्यावर एकाच वेळी उत्तर देते. उत्तर प्रदेशातील सोनभद्र जिल्ह्यातील उंचादीह गावात 'मेरा प्लास्टिक, मेरी जिम्मे- दारी' ही संकल्पना उभी केली आहे ग्रामप्रमुख अर्चना त्रिपाठी यांनी. दोन किलो प्लास्टिकच्या बदल्यात महिलांना सॅनिटरी नॅपकिन्स दिले जातात. यामुळे केवळ प्लास्टिक कचऱ्यावर उपाय मिळत नाही तर मासिक पाळीच्या अनिष्ट समजुतींवर कुठल्याही प्रचाराशिवाय हळूहळू मात केली जाते. याच जिल्ह्यातील घोरावल भागात ग्रामप्रमुख परमेश्वर पाल हे दररोज ई-रिक्शा घेऊन गावभर फिरत प्लास्टिक कचरा गोळा करतात. हा उद्योग ग्लॅमरस नसला, तरी तो लोकांची सवय आणि दृष्टीकोन बदलतोय, हे ते स्पष्टपणे सांगतात. उत्तराखंडमधील सिरासू गावाने पर्यटनाच्या माध्यमातून स्वच्छता निधी उभारण्याचा वेगळाच मार्ग निवडला आहे. आता गावाने लग्नाआधीचे फोटोशूट्स, तंबू भाड्याने देणे, लाईटिंग साहित्य इत्यादींमधून मिळालेल्या उत्पन्नातून गावाने शौचालये, प्लास्टिक संकलन केंद्रे आणि पर्यटनासाठी लागणारी पायाभूत सुविधा उभारली आहे. इतरही काही राज्यांमधून अशाच प्रकारची चळवळ सुरू झाली आहे. या सगळ्याच्या पाठीमागे एक समान सूत्र आहे. ते म्हणजे गावकऱ्यांचा सहभाग, स्थानिक नेतृत्व, आणि शून्य वायफळ खर्च. हे सगळे उपक्रम सरकारच्या १,८२५ ग्रामीण प्लास्टिक कचरा युनिट्सपेक्षा अधिक प्रभावी वाटतात, कारण ते गावाच्या गरजा समजून उभे राहिले आहेत. या विविध प्रयोगांमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, धोरण हे केवळ दिशादर्शक असावं; प्रत्यक्ष कृती मात्र जमिनीवरची माणसंच ठरवतात. 'भुकेल्याला अन्न' किंवा 'स्वच्छतेच्या बदल्यात आत्मसन्मान' या साऱ्या कल्पना केवळ आकड्यांपुरत्या मर्यादित नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या लाटा आहेत. भारताच्या स्वच्छतेच्या प्रवासा- तील पुढचा टप्पा केवळ यशस्वी कार्यक्रम सुरु करण्यात नाही, तर त्यांना चालू ठेवण्यात आहे. या प्रयत्नांचा टिकाव लागावा, तो समुदायाच्या सहभागातूनच शक्य आहे. सरकारी योजनांमध्ये ही प्रेरणा रुजवणं ही आता खरी गरज आहे. अशा 'गावाकडून सुरू झालेल्या' आंदोलनांनी भारताचा खरा स्वच्छता आराखडा तयार होतोय, जिथे स्वच्छतेचा अर्थ केवळ स्वच्छ परिसर नाही, तर एक सशक्त, सन्मानित आणि जबाबदार समाज घडवणं आहे.

# अहिल्याबाई होळकर : भारतीय इतिहासातील एक कृतार्थ



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील चोंडी नावाच्या एका छोट्या गावामध्ये ३१ मे १७२५ मध्ये झाला. त्यांचे वडील माणकोजी एक सामान्य कुटुंबातील, शेळ्या-मेंढ्या हाकणारे सामान्य माणूस होते. त्यांच्याकडेच गावची पाटीलकी होती. मल्हारराव होळकर एके दिवशी माणकोजी यांच्या घरी मुक्कामी होते. आठ वर्षाची चुणचुणीत, नटखट अहिल्याबाई मल्हारराव यांच्या दृष्टीस पडली. सर्वगुणसंपन्न असलेल्या अहिल्याबाईस मल्हारराव यांनी माणकोजीकडे आपल्या पुत्रासाठी मागणी घातली.

अहिल्याबाई आठ वर्षांच्या असताना इसवी सन १७३३ मध्ये त्यांचा विवाह मल्हारराव यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी झाला.

खंडेराव शूर पराक्रमी होते, परंतु त्यांचे मन राज्यकारभारामध्ये गुंतले नाही. १७ मार्च १७५४ रोजी खंडेराव यांचा भरतपूर जवळील कुंभेर येथे तोफेचा गोळा अंगावर पडून मृत्यू झाला. त्यावेळी अहिल्यादेवी केवळ २९ वर्षांच्या होत्या. अहिल्याबाईंचे सासरे मल्हारराव यांनी अहिल्याबाईंना सती जाण्यापासून परावृत्त केले. एवढेच नाही तर राजकारभारातील अनेक जबाबदाऱ्या दिल्या. अहिल्याबाईंवर त्यांची सासू गौतमाबाईंच्या धार्मिक वृत्तीचा प्रभाव पडलेला होता. अहिल्याबाई राज्यकारभारामध्ये अनेक निर्णय न्यायप्रविष्ठतेने घेत असत.

१७६६ मध्ये मल्हारराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाई यांनी पुत्र मालेरावांना गादीवर बसवले, परंतु एका वर्षांमध्येच त्यांच्या पुत्राचा मृत्यू झाला. तेव्हा सर्व कारभार अहिल्याबाई यांनी आपल्या हाता- मध्ये घेतला. मल्हारराव होळकर यांचे विश्वासू तुकोजी यांना सेनापती नियुक्त केले. राज्य कारभार करत असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. कठीण परिस्थितीमध्येसुद्धा पेशव्यांनी अहिल्याबाईंना पूर्ण समर्थन दिले. माधवराव पेशवे आणि त्यांची पत्नी रमाबाई हे अहिल्याबाईंचा आदर करत असत. सवाई जयसिंह यांचेही समर्थन मिळाले. नाना फडणवीस सुद्धा त्यांना देवी मानत होते. अहिल्याबाई यांच्या नेतृत्वामध्ये इंदूरचा एवढा विकास झाला की, ते सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखा आहे. दया, सहिष्णुता आणि उदारता हे त्यांच्या शासनाचे मुख्य लक्ष होते. लोककल्याणकारी निर्णय घेऊन त्यांनी राज्यकारभार चालवला. त्यांचे शेजारी राज्यासोबत संबंध खूप छान होते. एक वेळ सोडली तर एकदाही त्यांच्यावर शेजारी राज्याने आक्रमण केले नाही.

अहिल्यादेवी फार दानशूर होत्या. त्या दानधर्म राजकोषातील पैशाने नाही तर स्वतःच्या मालकीच्या पैशातून करत असत. त्यांनी केदारनाथ, रामेश्वर, जगन्नाथपुरी, द्वारका अशा अनेक मंदिरामध्ये घाटाची निर्मिती केली होती. त्यांनी महादेवाची मंदिरे बांधली. पशु-पक्ष्यांवर त्या खूप प्रेम करत असत. नेहमी सत्याची कास धरून त्यांनी आपला राज्यकारभार चालवला. श्रावण महिन्यामध्ये नर्मदा नदीच्या कडेला १३ ऑगस्ट १७७५ मध्ये अहिल्याबाई यांचे निधन झाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्ताने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. सगळीकडे अनेक उपक्रमांनी देवींची जयंती साजरी होत आहे. नांदेडकरांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती महानाट्याच्या रूपाने पर्वणी ठरणार आहे. जवळपास १०० स्थानिक कलाकार आपल्या कलाविष्काराने लोककल्याणकारी राणीचा जीवनपट उलगडून दाखवणार आहेत. पुण्यश्लोक देवी अहिल्याराणी या महानाट्याचे सादरीकरण या महानाटयाच्या लेखिका आणि दिग्दर्शिका प्रा. डॉ. सौ. वैशाली गोस्वामी-कुलकर्णी आणि संस्कार भारती नांदेड समिती यांच्या अथक परिश्रमाने साकार झाले आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या साहाय्याने नाटकाचे सादरीकरण दि.३१ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वा. कुसुम सभागृह नांदेड येथे होणार आहे. सर्वांनी या महानाट्याला पाहण्याची संधी दवडू नये. सर्वांसाठी मोफत प्रवेश आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**-गुलाबराव पावडे**
नांदेड
मो. ८६६८२७१३०५

# लोकमाता अहिल्यादेवी होळकर आणि अस्वस्थ वर्तमान

एखाद्या महामानव गेल्यानंतर शेकडो वर्षांनी त्या व्यक्तीची आवश्यकता का जाणवते? याचे कारण म्हणजे त्या महान व्यक्तीने आपला वर्तमान आपल्या उक्ती आणि कृतीने अजरामर केलेला असतो. माणसाचे माणूस म्हणून जन्माला येणे हे केवळ श्रेष्ठत्व नसून त्याने माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर आपले माणूसपण कसे सार्थ करून दाखवले हे मोलाचे असते! खडतर परिस्थितीतच खऱ्या अर्थाने माणसा- ची बौद्धिक, शारीरिक, वैचारिक, कृतीशील क्षमता सिद्ध होत असते. कठीण काळच खऱ्या अर्थाने माणसाच्या अंकुरण्याचा महत्वपूर्ण क्षण असतो. या सर्वच सदुणांचे मूर्तरूप म्हणजे राजमाता, राष्ट्रमाता, जनसाम न्यांचा उद्धारकर्त्या, लोकमाता अहिल्यादेवी होळकर! महाराष्ट्राच्या मातीचा इतिहास मोठा देदीप्यमान आहे. इतिहासामध्ये स्त्रीयांचे योगदानसुद्धा तेवढेच तोलामोलाचे आहे. सर्वच लढाऊ बाण्याच्या स्त्रियांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे स्थान दिपस्तंभासारखे अढळ आहे! मराठ्यांच्या इतिहासामधील बाजीराव पेशव्यांचे माळवा प्रांताचे सरदार श्री मल्हारराव होळकर यांनी आपल्या सुनेला आपल्या मुलीसारखे सांभाळून सती जाण्यास प्रतिबंध केला. त्यांनी १२ वर्षे आपल्या सासऱ्यांना राज्यकारभार करायला मदत केली. दुर्दैवाने १७६६ साली श्री मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी श्रीमती अहिल्याबाईवर येऊन पडली.



अठरावं शतकांत सर्वत्र कर्मकांड आणि जीवघेण्या अमानवी परंपरांनी थैमान घातलेलं असतांना अहिल्यादेविंना पेशव्यांनी माळवा प्रांत सांभाळण्याची परवानगी दिली आणि तेथूनच सुरु झाला त्यांचा थक्क करून सोडणारा राजकीय आणि सामाजिक कार्याचा अलौकिक प्रवास! तत्कालीन समाजाने स्त्री केवळ चूल आणि मुल, पडदा पद्धती (घोषा) मध्ये बंदिस्त केली असतांना त्यांनी सर्व बंधने झुगारून रयतेसाठी कार्य केले. काही बुरसटलेल्या परंपरावाद्यांनी देवींना राज्य करण्यास विरोध केला, मात्र कुणाच्याही विरोधाला त्यांनी भिक घातली नाही.

अहिल्यादेवींच्या मातृहृदयाला तत्कालीन अडचणींची जाण होती. कुठेही स्त्री आणि गरीबांवर अन्याय-अत्याचार होणार नाही याची सदोदित काळजी घेतली. सामन्यांचे प्रश्न एकूण सोडवणूक करण्यासाठी नियमित जनता दरबार सुरु केला. शेतकरी आणि स्त्रियांच्या समस्या आणि प्रश्नांना विशेष प्राधान्य होते. शेतकरी आणि गृहिणी जर सुखी राहीले तर समाजमन आनंदाने बहरून येईल हे लोकमानस मातोश्रींच्या ठिकाणी असल्याकारणाने त्यांनी हे दोन घटक प्राधान्याने सुधारणेसाठी समोर ठेवले होते. शेतकऱ्यांसाठी तिजोरीतून ठिकठिकाणी विहिरी आणि तलाव बांधून सिंचनाची व्यवस्था केली. शेतकऱ्यांना छोटे उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देऊन तिजोरीतून सहकार्य केले. गावोगाव शेतकरी जागृतीसाठी मेळावे घेऊन लोकप्रबोधन केले. याशिवाय विधवा स्त्रियांना दत्तक पुत्र घेण्याचा अधिकार नाकारलेला असतांना स्त्रियांना दत्तक पुत्र घेणे, वडिलोपार्जित किंवा पतीची शेती आणि संपत्ती त्या स्त्रीच्या नावावर लावण्यासाठी त्या आग्रही राहिल्या आणि तशी सरकार दरबारी नोंद घेण्यास महसूल विभागांस आदेशित केले.

मातोश्रींची लोकप्रियता गगनाला भिडली आणि सामान्य लोकांबरोबरच विविध विषयांची जाण असण- ारे विद्वान, शास्त्री, पंडित, लेखक, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम मातोश्रींना भेटून लोकसेवेचा आग्रह धरू लागले. परिणामी त्यांच्या राज्यातील सामान्य जनतेला हे तज्ञ लोक सहज उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे त्यांची महेश्वर नगरी विद्वानांचे माहेरघर म्हणून ओळखली जाऊ लागली. त्यांची राजधानी म्हणजे संगीत, कला आणि संस्कृतीचे आनंदभुवन झाले. याशिवाय चोर, दरोडेखोर, भिल्ल आणि अन्य चोरी-लुटमार करणाऱ्या लोकांचे मन-मत परिवर्तीत करून त्यांना गाई-म्हशी-जमिनी देऊन शेती-उद्योग करण्यास प्रवृत्त केले. याचा परिणाम असा झाला की; त्यांच्या राज्यातील चोऱ्या, दरोड्यांचे प्रमाण कमी झाले, परंतु एवढे करूनही कुणी ऐकत नसेल त्यांना तोफेच्या तोंडी देऊन दुष्ट लोकांमध्ये दहशत पसरवली. राज्यांत सर्वत्र रस्ते आणि किल्ले बांधून आपले राजकीय कर्तृत्व सिद्ध करून दाखविले. आपल्या राज्यात न्यायालयीन सक्रियता अमलात आणली. सामान्य लोकांना तत्काळ न्याय मिळावा म्हणून जिल्हा न्यायालये स्थापन करून न्यायासाठी राजदरबार चोवीस तास लोकांसाठी खुला ठेवला. सर्वांना मोफत शिक्षण, सरकारी तिजोरीतून सामान्यांना आरोग्य सुविधा आणि बेरोजगार तरुणांना नौकरी देऊन राज्यातील जनता जनार्दनाची सेवा करण्याचे महत्कार्य केले. अशाप्रकारे मातोश्री अहिल्यादेवी एक गुणग्राहक आणि जनकल्याणार्थ राज्यकारभार करणाऱ्या स्त्री राज्यकर्त्या लोकमाता म्हणून भारतभर ना- वारुपास आल्या!

लोकमाता अहिल्यादेवी होळकरांनी लोकोद्धारक वैश्विक विचारांना कृतीची जोड देऊन भारत वर्षासमोर एक आदर्श ठेवला. न्याय विकासाचा पाया असून त्याद्वारे मजबूत आणि समृद्ध राष्ट्र निर्माण होत असते. खरा धर्म केवळ पूजा-अर्चा-अनुष्ठानात नसून म नवसेवा हीच सर्वश्रेष्ठ पूजा आहे. कोणत्याही धर्मातील खरी अध्यात्मिकता, चैतन्य हीच मुल्ये सर्वोच्च सुख देत असते. स्त्री पुरुषांपेक्षा कमजोर नसते, फक्त तिच्या सुप्त शक्तीचा विनियोग योग्य पद्धतीने करता यायला हवा. मानवी जीवनात संपत्तीपेक्षा ज्ञान हीच श्रेष्ठ शक्ती असून ज्ञानाधारे तमाम मानवजातीचा विकास करणे शक्य आहे. त्यासाठी शिक्षणच ही जगातील एकमेव शक्ती आहे ज्याधारे प्रत्येक व्यक्ती खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होऊ शकतो. सरकार आणि शासन केवळ सत्तापोभोग नसून सामन्यांची सेवा करून त्यांच्या जीवनात मूलगामी सुधारणा करणे हाच त्याचा खरा अर्थ आहे. समाज तेव्हाच सक्षम होऊ शकतो, जेंव्हा तिथे स्त्री-पुरुषांना समान संधी असते. हे विचार व्यक्त करतांना ते सर्वच विचार कृतीत आणण्याचा त्यांनी आजीवन प्रयत्न केला.

माय बापहो, लोकमातेला आपल्यातून जाऊन तब्बल अडीचशे वर्षे झाली आहेत. देशात आत्तापर्यंत अनेक राजे-महाराजे आले आणि गेले पण एका धुरंधर लेकीच्या, राजमातेच्या कामाची सर कुणालाही आली नाही. आपली लोकशाही शतकाकडे वाटचाल करतांना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि न्यायालयीन क्षेत्रातील मंडळी लोकमातेच्या पावलावर चालत आहे का? विविध लोकलुभावन योजना शासन करत असले तरी दिवसेंदिवस प्रश्न, समस्या वाढतच आहेत. राजमातेच्या जयंतीचा एवढा मोठा जल्लोष होत असतांना खरंच स्त्री सुरक्षित आहे का? शिक्षण महाग होत चाललंय. शेतमाल- ला भाव नाही. शेतकरी आत्महत्या थांबत नाहीत. गुन्हेगारीचे प्रमाण वाढते आहे. सर्वच धर्मातील मूळ तत्वे बाजूला जाऊन थोतांड, कर्मकांडाचे स्तोम माजले आहे. जात, धर्म, सांप्रदायिकता, कट्टरता सम ाजाला पोखरत असून याला खतपाणी कोण घालतेय? याचाही सखोल विचार व्हायला हवा. स्वयंघोषित विचारवंत कुणाच्यातरी वळचणीला जाऊन बसलेत. न्यायदानाला दिरंगाई म्हणजे न्याय नाकारणे. सामान्यांना वेळेवर, न्याय मिळतोय का? लोकरक्षकच लोकभक्षक झालेत. भ्रष्टाचार शिष्टाचार झालाय. बरबटलेले हात महामानवांचे पूजन करताहेत! कुंपणानेच शेत गिळंकृत केले आहे, दाद कुणाकडे मागणार? असे भयंकर चित्र असतांना, माझी सर्वांना हात जोडून नम्र विनंती आहे, कृपया आपणही भारतमातेचे काहीतरी देणे लागतो या न्यायाने ज्याला जमेल तसे आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, बंधुता, न्याय, स्त्री सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, देशप्रेम इत्यादी मूलगामी तत्वांकडे लक्ष देऊन थोडा का होईना सेवाभाव जपावा! असे झाल्यास, तुम्ही कोणत्याही पक्ष, धर्म, जातीचे असा, कुणीही असा पण मी माणूस असून माणसासोबत माणसासारखे वागेन एवढेच वृत्त अंगी बाणवा! हेच खऱ्या अर्थाने माझ्या लोकमातेला खरे अभिवादन असेल, अन्यथा केवळ फोटोग्राफी!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाय**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
मो. ९१५८०६४०६८

# तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा खाणे घातकच; परंतु खाऊन थुंकणे महाघातक





संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू- पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दूर करण्याकरिता तंबाखू निषेध दिवस साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटना डब्लूएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिम ारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषित करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला. ८ एप्रिल १९८८ ला डब्लूएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केला जातो.

तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व ४० प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता डब्लूएचओने महामारी घोषित केली. डब्लुएचओच्या माहितीनुसार जगात तंबाखूने किंवा धूम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढू शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय. मानवाची जगण्याची दशा, दिशा ठरविणे हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परिवाराला घातक सिद्ध होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सरसारखे महाभयानक आजाराने माणूस जखडतो आणि याचा दुष्परिणाम संपूर्ण परिवाराला भोगावा लागतो. या बाबी मानवाने स्वत: समजून घ्यायला हव्यात

कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते. सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आवाहन करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते. या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पूर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरिता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. या व्यतिरिक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करताना दिसतात. परंतु सरकार स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली (मद्द, तंबाखू, खैनी, सिगारेट, बिडी, गुटखा, गांजा इत्यादी) वस्तुंपासून राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो. यावरून स्पष्ट होते की, सरकार पैसा कमविण्याकरिता दुटप्पी धोरण अवलंबून मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाऊन होता. या काळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्वप्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली. यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला. यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी, तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा, गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या, परंतु नशा सोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती. परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुल- ताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची फज्जा उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ किलो मिटरपर्यंत लोक रांगेत उभे होते. अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही. प्रत्येकाने जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही. कोणतीही नशा असो, ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्याशिवाय रहाणार नाही. याला म्हणतात, अती तिथे माती. त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे. अन्यथा जीवित हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही. मग या वस्तूचे सेवन का करावे?

कोणतीही नशा असो, ती शरीराचा विकास तर करीत नाहीच उलट शरीराला छल्ली व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते. आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रूपये किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रूपये किलो, शुद्ध तुप ६०० रूपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रूपये किलो, सफरचंद १०० रूपये किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रूपये किलो, दूध ५० रूपये लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रूपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नशेली वस्तूंपेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत. परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

कोव्हीड-१९ च्या महामारी- पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती. त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती. यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. कोरोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धूम्रपानामुळे कोरोनाची लागण होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालणे उचित होते. तीच पद्धत नेहमीसाठी सरकारकडून अमलात यायला हवी. सध्याच्या परिस्थितीत युवापिढी धूम्रपानाच्या आहारी जाताना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवून धूम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धूम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाणे म्हणजे मृत्यूच्या रांगेत उभे राहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी. कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमणात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे कोणत्याही नशेपासून सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुदृढ राहिलो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षितरीत्या जगलो तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित राहिला तर जग अवश्य सुरक्षित होईल. त्यामुळे तंबाखू, खर्रा खावुन रस्त्यावर थुंकू नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देऊ नका, हे आग्रहाचे आणि कळकळीचे आवाहन. याकरिता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की, यानंतर धूम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करूया.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

## थोडक्यात...

### अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त आज शिबीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** लायन्स नेत्र रूग्णालय जंगमवाडी नांदेड, ग्रामपंचायत कार्यालय गोपाळ चावडी व भिवराज कलंत्री नर्सिंग इन्स्टिट्यूट सिडको नांदेड यांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दि. ३१ मे रोजी मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. कलंत्री हॉस्पीटल इच्छापूर्ती हनुमान मंदिर समोर हडको येथे सकाळी १० ते २ दरम्यान हे शिबीर होणार असून शिबीरातील निवडक रुग्णांवर जंगमवाडी नांदेड शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिरात जास्तीत जास्त रूग्णांनी नाव नोंदणी करावी आणि या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन भिवराज कलंत्री नर्सिंग इन्स्टिट्यूटचे डॉ. अशोक कलंत्री, डॉ. सुरेखा् कलंत्री, डॉ. अपूर्वा कलंत्री यांनी केले आहे.

### लाईन ब्लॉकमूळे औरंगाबाद-गुंटूर एक्सप्रेस अंशतः रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड रेल्वे विभागातील औरंगाबाद आणि जालना दरम्यान बी. सी. एम. मशीनने रेल्वे पटरीची देखरेख दुरुस्ती करण्याकरिता दि. ३१ मे ते २० सप्टेंबर २०२५ दरम्यान ०३ तासांचा लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे औरंगाबाद गुंटूर – औरंगाबाद एक्सप्रेस काही दिवस अंशतः रद्द करण्यात आली आहे. गाडी क्रं. १७२५४ औरंगाबाद गुंटूर एक्सप्रेस शनिवार दि. ३१ मे २०२५ ते २० सप्टेंबर २०२५ दरम्यान औरंगाबाद – जालना दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. या तारखेस ही गाडी जालना ते गुंटूर अशी धावेल. ही गाडी जालना येथून तिच्या नियमित वेळे सायंकाळी ५ वाजता सुटेल.

# एकही बालविवाह होणार नाही याची दक्षता घेण्याचे जिल्हाधिकारी कर्डिले यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी सर्वांनी समन्वय साधून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. बालविवाह निर्मूलन ही चळवळ अधिक सक्रिय करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे असून जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.



बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाच्या माध्यमातुन बालविवाह निर्मूलन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग, पंचायत, आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), उमेद या सर्व विभागांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेला बालविवाह मुक्त नांदेड जिल्हा हा कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्सची नियुक्ती केली आहे. या सर्व विभागाच्या चॅम्पियन्ससाठी एकदिवसीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेचे २८ मे रोजी हॉटेल सिटी सिंफोनी नांदेड येथे संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मंजुषा कापसे, शिक्षणाधिकारी प्रा. श्रीमती सविता बिरगे, महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे, परिवीक्षा अधिकारी गजानन जिंदमवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बालविवाहाच्या कोणत्याही प्रकरणात दिरंगाई होणार नाही याबाबत सर्वांनी कटाक्षाने कायद्याचे पालन करावे. बालविवाहात कोणतेही बालक ओढले जाणार नाही यासाठी सर्वांनी सतर्क राहून कार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या. बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देऊन प्रशिक्षणार्थ्यांशी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी मनमोकळा संवाद साधला.

या प्रशिक्षणात आराखडयाची अंमलबजावणी, पाठपुरावा, नियोजन, माहिती विश्लेषण, समन्वय, मूल्यमापन आणि संनियंत्रण संदर्भातील गुगल फार्मवर देखरेख तालुका निहाय, बालविवाहाची कारणे व विभाग निहाय उपाय व हॉटस्पॉट गावाची ओळख, महाराष्ट्रातील बालविवाहाचे प्रमाण परिणाम, सक्षम कार्यक्रम आढावा, बालहक्क, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, असुरक्षित बालकांची ओळख, बालविवाह प्रकरण हाताळणे हेतु कार्यवाही व पाठपुरावा, किशोरवयीन मातांसाठी सहाय्य करण्यासाठी यंत्रणांचे बळकटीकरण विभागांचा दृष्टिकोण व समन्वय, बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्सची भुमिका आणि जबाबदारी, कम्युनिकेशन किट, युनिसेफचे-बालविवाह समाप्त करण्यासाठी जागतिक कार्यक्रम, बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखडा कार्यान्वयन योजना तयार करणे, साप्ताहिक देखरेखीचे फॉरमेट तयार करणे, जिल्हा कृती दल बैठकीसाठी अहवाल तयार करणे, जिल्हा कृती आराखड्यासाठी सहाय्य व नियोजन, माहिती संकलन आणि विश्लेषण, प्रेरणादायी व सकारात्मक प्रकरणांचे दस्तऐवजीकरण आदी विषयांवर हे प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील पंचायत विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कार्यालय कर्मचारी, चाईल्ड लाईन १०९८ कर्मचारी, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम (RKSK), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद अभियान) यांनी नियुक्त केलेल्या एकूण बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास साधन व्यक्ती म्हणून एसबीसीथ्रीचे बालविवाह निर्मूलन प्रकल्पाचे प्रकल्प अंमलबजावनी प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बढिये, प्रकल्प समन्वयक रुचिका अहिरे, मोनाली धुर्वे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणात संबंधित सर्व विभागातील बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स यांचा उत्कृष्ट सहभाग होता.

## नांदेड परिमंडळ अंतर्गत सुरळीत व अखंडित वीजपुरवठ्यासाठी ट्रान्सफॉर्मर क्षमतेमध्ये वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरण नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील वीज ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा करण्यात येणार आहे. त्याकरिता मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजने अंतर्गत अतिभारीत (ओव्हर लोडेड) असलेले ३३ केव्ही उपकेंद्रातील नऊ पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यात आली आहे.



नांदेडजिल्ह्यातील आष्टी, भरड शेवाळा व शिराढोण या तीन ३३/११ केव्ही उपकेंद्रातील एक ३.१५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून १० MV करण्यात आली व दोन ५ MV पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून १० MV करण्यात आली. असे ३ पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकूण १६.८५ एमव्हीए क्षमतावाढ करण्यात आली. त्यामुळे वरील उपकेंद्र परिसरातील जवळपास १२ हजार ८३८ ग्राहकांना आता योग्य दाबाने वीज पुरवठा होत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील आडगाव, खानापूर चित्ता, वारंगा, आखाडा बाळापूर, गोरेगाव व खिल्लार या सहा ३३/११ केव्ही उपकेंद्रातील दोन ३.१५ MV पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून १० एमव्हीए करण्यात आली व चार ५ MV पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून १० एमव्हीए करण्यात आली असे ६ पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकूण ३३.७० एमव्हीए क्षमतावाढ करण्यात आली आहे. त्यामुळे वरील उपकेंद्र परिसरातील जवळपास २९ हजार ४१८ ग्राहकांना आता योग्य दाबाने अखंडीत व सुरळीत वीज पुरवठा होत आहे.

महावितरण नांदेड परिमंडळ अंतर्गत ९ उपकेंद्रात पॉवर ट्रान्सफॉर्मरची ५१.५५ MV क्षमतावाढ केल्यामुळे या उपकेंद्र मधून एकूण ४२ वीज २५४ ग्राहकांना अखंडित, सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा मिळत आहे. या बदल वीज ग्राहकांकडून महावितरणच्या MSKVY २.० योजने बद्दल समाधान व्यक्त होत आहे.

## महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त सिडको वृत्तपत्र विक्रेता टिनशेड येथे वृत्तपत्र विक्रेता पाल्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी पावसाळ्यात सायकलवरील वृत्तपत्र गठ्ठ्यांसाठी मेनकापड वाटप करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिडको येथील वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या टिन शेड येथे नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रमेश ठाकूर व सामाजिक कार्यकर्ते राजु चव्हाण यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रमेश ठाकूर, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, भाजयुमोचे महानगर जिल्हा सरचिटणीस माधव शिरसाठ, सामाजिक कार्यकर्ते अमोल जाधव, सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सतिश कदम व रतन लांडगे, महिला वितरक वंदना लोणे, लोकमत वितरणचे गणेश डोळस आदी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या उपस्थितीत महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वृत्तपत्र विक्रेता पाल्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तर पावसाळ्यात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सायकलवरील पेपरचे गठ्ठे भिजू नये, यासाठी मेनकापडचे वाटप करण्यात आले. जयंती निमित्ताने वृत्तपत्र विक्रेते यांना मिठाई वाटप करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते मदन सिंह चव्हाण, राम धांवडे, दौलतराव कदम, बालाजी सुताडे, बालाजी दमकोंडवार, साई गोटमवार, अमोल नांदेडकर, धुव्र लोणे, शुभम धावडे, गणेश कांबळे, गणेश ठाकूर यांच्यासह वृत्तपत्र विक्रेते व नागरिक उपस्थित होते.

## जि.प.कर्मचाऱ्यांसाठी कृत्रीम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर कार्यशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रशासकीय कामाकाजात कार्यक्षमतेचा स्तर उंचावण्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व्हावा, यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात अधीक्षक, सहाय्यक प्रशासन अधिकारी आणि कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्यासाठी शुक्रवारी कार्यशाळा घेण्यात आली.



या कार्यशाळेस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड आदी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी सांगितले की, प्रशासकीय कामकाज अधिक सहज, सुलभ व परिणामकारक करण्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर अत्यंत उपयुक्त ठरतो. डिजिटल युगात प्रशासनाला सक्षम करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेमध्ये पुणे येथील 'एमकेसीएल'चे विभागीय आयुक्त विनायक कदम यांनी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्यक्ष ऑनलाइन उदाहरणांद्वारे कृत्रीम बुद्धिमत्ता आधारित विविध अनुप्रयोगांची माहिती दिली. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेला नांदेड येथील 'एमकेसीएल'चे जिल्हा व्यवस्थापक पंढरीनाथ आघाव व जिल्हा परिषदेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे जिल्हा प्रकल्प प्रमुख कुलदीप जोशी यांची उपस्थिती होती. उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद व्यवहारे यांनी सूत्रसंचालन तर पांपटवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यशाळेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये डिजिटल परिवर्तन व आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर घडून येईल, असा विश्वास उपस्थित कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला.

## वैशाख पौणिमेनिमित्त तथागत भगवान बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना

**नांदेड (प्रतिनिधी)–** मारतळा (ता.लोहा) येथील नालंदा बुद्ध विहारात शांतिदूत तथागत भगवान बुद्ध यांच्या मूर्तीची बौद्धाचार्य शिवाजीराव भुरे यांच्यावतीने रविवारी दि. २५ मे रोजी प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सकाळी १०.३० वाजता तथागत भगवान बुद्धांचे व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा करून माजी जि.प. सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच बौद्धाचार्य शिवाजीराव भुरे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण झाले.

यावेळी प्रवीण पाटील चिखलीकर, माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर यांची भाषणे झाली. कार्यक्रमास्थळी माजी जि. प. सदस्य गणेशराव पाटील सावळे, ग्रामसेवक अमोल देशमुख, सुभाष शिंदे, प्रकाश भुरे, नागोराव माळेगावे, तेजेराव शिंदे, गंगाधर निर्मळे, कुसूमताई जोंधळे, गंगाधर भुरे, अशोक भुरे, मधुकर भुरे, नागोराव जोंधळे, पंडीत भुरे, साधू भुरे, परमेश्वर भुरे, नागोराव बुचडे, शुद्धोधन भुरे, माधव रघुनाथ गजभारे यांच्यासह गावातील उपासक-उपासिका पांढरे वस्त्र परिधान करून उपस्थित होते. सायंकाळी ४ वाजता गावातून तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीची मिरवणूक काढण्यात आली. तसेच रात्री ८ ते सकाळी ६ वाजेपर्यंत प्रसिद्ध कवी, गायक, प्रबोधनकार विजयकुमार पवार यांचा संच, दुसरा भीमशाहीर प्रा. गौतम पवार आणि त्यांचा संच यांच्यावतीने गायनाचा कार्यक्रम झाला.

## खरीप हंगामपूर्व सभांमधून कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे

**मुदखेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील बारड व नागेली येथे खरीप हंगाम पूर्व सभा घेण्यात आली. या सभेत शेतकऱ्यांना उगवण क्षमता, बीजप्रक्रिया, प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले.



मुदखेड तालुक्यात सोयाबीनचे ६५ % क्षेत्र आहे. यावर्षी मान्सून लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात टोकन व बीबीएफ वर लागवड करणे. त्याचे फायदे महत्व पटवून देऊन लागवड खर्च कसा कमी करता येईल. तूर पीक बाबतीत लागवड खर्च कमी असून हमीभाव चांगला मिळण्यासाठी त्याचे क्षेत्र वाढवणे, सोबतच घरचे बियाणे वापरत असल्यास उगवण क्षमता कशी घ्यावी. बियाणे खरेदी करताना काय काळजी घ्यावी. पक्के बिलापासून पिशवी कापण्यापर्यंत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कृषिक ॲप काही शेतकऱ्यांनी डाउनलोड करून घेतले. त्याचे महत्व त्यांना सांगण्यात आले. तसेच महाविस्तार युट्यूब, महानगरी वेबसाईट, महानगरी वेबसाईट, महाडीबीटी पोर्टल वरील अर्ज याबाबतही सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे, कृषी अधिकारी ज्योतिबा पवार, कृषी पर्यवेक्षक राम कपाटे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## 'एसजीजीएस'मध्ये टेक्स्टाईल व गारमेंट उत्पादनावर कौशल्य विकास कार्यशाळेचे सोमवारी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी येथील एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत वस्त्र तंत्रशास्त्र विभागाच्यावतीने युवक व युवतींसाठी 'टेक्स्टाईल व गारमेंट उत्पादन' या विषयावर दोन आठवड्यांची कौशल्य विकास कार्यशाळा घेण्यात येणार आहे. ही कार्यशाळा २ ते १६ जून दरम्यान होणार आहे.

या कार्यशाळेत ड्रेस डिझाईनिंग व गारमेंट या क्षेत्रात कौशल्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना धागा, कापड व गारमेंट कसा बनतो, याबद्दलचे मार्गदर्शन वर्ग व प्रात्यक्षिकांद्वारे माहिती देण्यात येणार आहे.

'एसजीजीएस' संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अशी कार्यशाळा वस्त्रतंत्र शास्त्र विभागातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात आली आहे. टेक्स्टाईल व गारमेंट या क्षेत्राकडे सरकार रोजगार, उद्योग, कौशल्य विकास आणि स्टार्टअपसाठी खूप गांभीर्याने पाहते आणि या क्षेत्रासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत व तरुणांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. टेक्सटाईल विभागातील उपलब्ध असलेली साधनसामुग्री व ज्ञान होतकरू विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवता येईल हा व्यापक दृष्टिकोन ठेवून टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश खुडे यांच्या मार्गदर्शनाखाली अशा प्रकारच्या कार्यशाळा आयोजित केली आहे. यात विद्यार्थ्यांना टेक्स्टाईल व गारमेंट क्षेत्रात उद्योजक बनण्यासाठी व रोजगार मिळवण्यासाठी एक व्यापक दूरदृष्टी मिळते.

या कार्यशाळेसाठी नोंदणी करणे व कार्यशाळे बद्दल माहितीसाठी सुधीर आंबेकर व सुरेश देशपांडे यांच्याशी संपर्क साधावा, असे अवाहन संचालक डॉ. मनेश कोकरे व विभाग प्रमुख डॉ. प्रकाश खुडे यांनी केले आहे.

## शंकरराव चव्हाण विद्यालयात भरली माजी वर्गमित्रांची शाळा

### कोलंबीत घडवून आणला गुरू शिष्यांचा अनोखा स्नेहमेळावा



**नायगाव बाजार (प्रतिनिधी) –** तालुक्यातील कोलंबी येथील श्री शंकराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सन १९९८ – ९९ च्या इयत्ता दहावी च्या बॅचमधील विद्यार्थी तब्बल २६ वर्षांनी कोलंबीत एकत्र आले. प्रवीण बियाणी यांच्या फॉर्म हाऊस येथे मंगळवारी या माजीवर्ग मित्रांच्या मैत्रीचा अनोखा स्नेह सोहळा भरला होता.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षिका बिडवई होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून पी. बी. वाघमारे, वाय. एफ आदमनकर, व्हि. जी. अमिलकंठवार, लक्ष्मण कंधारे, आडेपवार, ए. एच. बामणे, बी. एस. नीलावार, एन. आर. पांडे, सिरसे एस.बी., एस. एन. रामशेटवाड यांची उपस्थिती होती.

या वेळी सर्व प्रमुख अतिथी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व अनुभव कथन व्यक्त केले. विद्यार्थी गौस मस्तान सय्यद यांनी गायिलेल्या मैत्रीच्या आठवणींचा धागा स्पष्टपणे उमटला. उत्कृष्ट चित्रपट गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. निधन झालेल्या गुरूवर्य व वर्गमित्रांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रल्हाद पानगटवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. गुरु बद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या घडवण्याने मी आज घडलो ही भावना त्यांनी व्यक्त केली. बालाजी परिहार यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. रत्नप्रदीप मुधळे यांनी उपस्थित वर्गमित्रांचे आभार मानले. वाघमारे यांच्या सविस्तर मार्गदर्शनाने, बाळासाहेब पांडे यांनी सादर केलेल्या कवितेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी पुणे मुंबई, नाशिक, कोकणासह राज्यातील वेगवेगळ्या शहरातून २० ते ३० वर्गमित्र या स्नेहमेळाव्यात सहभागी झाले होते.

# रेल्वे स्थानकांत प्लास्टिक वाटर बॉटल क्रशर मशीन वापराचे प्रात्यक्षिक आणि उद्घोषणा यंत्रणेद्वारे जनजागृती मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'प्लास्टिक प्रदूषण संपवा' या मोहिमे अंतर्गत दि. २७ मे आणि २८ मे रोजी प्रवाशांना प्लास्टिक वाटर बॉटल क्रशर मशीन वापराचे प्रात्यक्षिक आणि पब्लिक अनाउंसमेंट सिस्टमद्वारे नांदेड रेल्वे विभागातील नांदेड, पूर्णा, परभणी, जालना, औरंगाबाद आणि नगरसोल रेल्वे स्थानकांवर जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यात प्रवाशांनी भरपूर प्रतिसाद दिला.

जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर, नांदेड रेल्वे विभागात 'प्लास्टिक प्रदूषण संपवा' या विषयावर आधारित १५ दिवसांच्या जनजागृती मोहिम उत्साहात राबविली जात आहे.

या मोहिमेअंतर्गत रेल्वे स्थानकांवर प्रवाशांन वापरानंतर प्लास्टिक वाटर बॉटल क्रशर मशीनच्या सहाय्याने कशा प्रकारे क्रश करावी याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच रेल्वे स्थानकांवर पब्लिक अनाउंसमेंट सिस्टमद्वारे या विषयी वारंवार उद्घोषणा करून जनजागृती करण्यात आली.




या सोबतच भारतीय रेल्वे प्लास्टिकनसलेल्यापर्यावरणपूरक कटलरीला प्रोत्साहन देण्याकरिता प्रवाशांन प्रोत्साहित करत आहे. रेल्वे स्थानकांवरील टी स्टॉल आणि कॅन्टीन मध्ये प्लास्टिकचा ग्लास आणि प्लेट ऐवजी प्लास्टिक विरहित पर्यावरणपूरक कटलरीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. इंडिअन रेल्वे केटरिंग आणि टूरीजम कोर्पोरेशन (आयआरसीटीसी) बायोडिग्रेडेबल किंवा प्लास्टिक नसलेल्या कटलरीच्या वापरासाठी मोहीम लवकरच सुरू करणार आहे.

प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी कर्मचारी जागरूकता कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत आणि पर्यावरण संरक्षणासाठी आपली बांधिलकी दर्शवित आहेत. या कार्यक्रमास विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप प्रदीप कामळे यांचे मुख्य मार्गदर्शन लाभत आहे.

ही मोहीम प्रवाशांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावणार आहे आणि स्वच्छ, हरित भविष्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे, असे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप प्रदीप कामळे म्हणाले.या मोहिमे अंतर्गत दि. २२ मे ते ५ जून दरम्यान नांदेड विभागातील विविध रेल्वे स्थानकांवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

CMYK

# Apple, Google, Facebook वर डल्ला! १८.४ कोटींहून अधिक पासवर्ड ऑनलाइन लीक

**ऑनलाइन डेटा लीक ही एक समस्या आहे जी लोकांच्या डिजिटल सुरक्षिततेला धोक्यात आणते. एका नवीन लीकमध्ये १८.४ कोटींहून अधिक पासवर्ड धोक्यात आले आहेत. हे पासवर्ड Apple, Google, Facebook, Microsoft सारख्या मोठ्या कंपन्यांशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. सायबर सुरक्षा संशोधक जेरेमिया फाउलर यांनी ही लीक शोधल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, एक असुरक्षित डेटाबेस सापडला आहे, ज्यामध्ये लाखो ईमेल आणि पासवर्ड होते. तो डेटाबेस एका अनइन्क्रिप्टेड टेक्स्ट फाइलच्या स्वरूपात होता, म्हणजेच तो उघडणे खूप सोपे होते. डेटाबेसमध्ये अशी माहिती होती ज्याद्वारे लोकांचे बँक खाते आणि आर्थिक खाते लॉग इन केले जाऊ शकते.**

## लीक झालेला डेटा कुठून आला?

डेली मेलच्या अहवालानुसार, हा डेटा इन्फोस्टीलिंग मालवेअरने कॅप्चर केला असावा. सायबर गुन्हेगार अनेकदा या मालवेअरचा वापर करतात आणि लोकांचे पासवर्ड आणि इतर माहिती चोरली जाते आणि डार्क वेबवर विकली जाते. संशोधकांनी लाखो पासवर्ड टेक्स्ट फाइलमध्ये साठवणाऱ्या होस्ट प्रोव्हायडरशी देखील संपर्क साधला. जेव्हा संशोधकाने फाइलच्या मालकाबद्दल विचारले तेव्हा होस्ट सर्व्हिसने तपशील दिले नाहीत. म्हणजेच, लाखो लोकांचा डेटा कोणी चोरला आहे हे माहित नाही. सायबर सुरक्षा संशोधक जेरेमिया फाउलर यांनी अनेक लोकांना मेल केले ज्यांचे पासवर्ड आणि इतर माहिती लीक झाली होती. लोकांनी त्यांचा डेटा खरा असल्याचे मान्य केले. संशोधकांचे म्हणणे आहे की जे लोक अनेक खात्यांमध्ये समान पासवर्ड वापरतात, त्यांचा डेटा लीक होण्याचा सर्वाधिक धोका असतो. जर एका खात्याचा पासवर्ड देखील सापडला तर उर्वरित खात्यांचे पासवर्ड आपोआप उघड होतात.



## तुमचा पासवर्ड कसा सुरक्षित ठेवावा?



तज्ञांचे म्हणणे आहे की लोकांनी कोणत्याही खात्यासाठी मजबूत पासवर्ड वापरावा. तो किमान आठ वर्णांचा असावा. त्यात मोठी अक्षरे, लहान अक्षरे, संख्या, विशेष वर्ण वापरू नयेत. तुमच्या पासवर्डमध्ये कधीही नाव, ईमेल किंवा मोबाइल नंबर समाविष्ट करू नका. टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर करावा. यामुळे तुमच्या पासवर्डला सुरक्षिततेचा अतिरिक्त स्तर मिळतो. याशिवाय, तुमचा पासवर्ड दर महिन्याला बदलला पाहिजे. जर तो कुठेतरी लीक झाला तर हॅकरला त्याचा काही उपयोग होणार नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमचा कोणताही पासवर्ड कधीही कोणासोबतही शेअर करू नका.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या...

## टेलिग्राम आणि एक्समध्ये काय शिजत आहे?

**एलोन मस्कची एआय कंपनी xAI आणि टेलिग्राम यांच्यात एक मोठी डील अंतिम झाली आहे. आता xAI चा चॅटबॉट ग्रोक देखील टेलिग्रामवर दिसणार आहे. टेलिग्रामचे संस्थापक आणि सीईओ पावेल दुरोव यांनी स्वतः X वरील पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. त्यांनी टेलिग्रामवरही ही माहिती शेअर केली आहे. पावेलच्या मते, टेलिग्राम आणि xAI ने एक वर्षाची भागीदारी केली आहे ज्या अंतर्गत ग्रोक चॅटबॉट एक अब्जाहून अधिक टेलिग्राम वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. हा चॅटबॉट सर्व टेलिग्राम ॲप्समध्ये एकत्रित केला जाईल. जेणेकरून वापरकर्ते स्मार्ट आणि वेगवान एआयचा अनुभव घेऊ शकतील.**

### कराराचे खास मुद्दे

xAI आणि टेलिग्राममधील या करारामुळे टेलिग्राम वापरकर्त्यांना प्रगत एआय तंत्रज्ञानाचा फायदा होणार नाही तर टेलिग्रामची आर्थिक स्थिती देखील खूप मजबूत होईल. या करारानुसार, टेलिग्रामला xAI कडून US$300 दशलक्ष मिळतील. याचा काही भाग इक्विटीच्या स्वरूपात देखील असेल. तसेच, टेलिग्रामला xAI च्या सबस्क्रिप्शनमधून मिळणारा ५०% महसूल टेलिग्रामद्वारे विकला जाईल. पावेल दुरोव्ह यांनी ही बातमी व्हिडिओ क्लिपद्वारे देखील शेअर केली आहे. या क्लिपमध्ये त्यांनी सांगितले की टेलिग्राममध्ये येणारे एआय फीचर्स जून २०२५ पासून सुरू होतील. ग्रोक एआय चॅटबॉट सर्व वापरकर्त्यांसाठी डीफॉल्टनुसार चॅट टॅबवर पिन केला जाईल. यामुळे लोकांना टेलिग्राम ॲपमध्ये ते ॲक्सेस करणे खूप सोपे होईल. याशिवाय, वापरकर्ते टेलिग्राम ॲपच्या सर्च बारद्वारे ग्रोकमध्ये प्रवेश करू शकतील.




### एआय फीचर्स उपलब्ध

ग्रोकसोबत येणाऱ्या एआय फीचर्सबद्दल टेलिग्रामवर एक खास व्हिडिओ सादर करण्यात आला आहे. या डीलनंतर टेलिग्राम वापरकर्त्यांना कोणते एआय फीचर्स मिळतील हे यावरून दिसून येते. अनेक एआय फीचर्सपैकी एक स्मार्ट टेक्स्ट एडिटिंग फीचर असेल, ज्याच्या मदतीने वापरकर्ते त्यांचा टाइप केलेला मेसेज सुधारू शकतील, त्याचा टोन बदलू शकतील किंवा त्यात नवीन माहिती जोडू शकतील. पुढील खास फीचर चॅट समरीज असेल, ज्याच्या मदतीने दीर्घ संभाषण किंवा मेसेजचे सार समजून घेणे सोपे होईल. याद्वारे, डॉक्युमेंट समरायझेशन सारख्या फीचर्सच्या मदतीने, कोणत्याही डॉक्युमेंटचा सारांश वाचता येईल. लिंक इनसाइट्स नावाच्या फीचरच्या मदतीने, वापरकर्ते कोणत्याही लिंकचे सार न उघडता पाहू शकतील.

### टेलिग्राममध्ये ग्रोक एआय फीचर्स

याशिवाय, टेलिग्राम चॅनेलमध्ये फॅक्ट चेक फीचर येणार आहे, जेणेकरून कोणताही मेसेज पुढे शेअर करण्यापूर्वी किंवा त्यावर कोणतीही कारवाई करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासता येईल. एआयच्या मदतीने, लोकांना इन्स्टंट स्टिकर जनरेशन आणि अवतार निर्मिती सारखी वैशिष्ट्येदेखील मिळतील, ज्यामुळे वापरकर्ते त्यांच्या प्रोफाइलसाठी मजेदार डिस्प्ले पिक्चर्स आणि कस्टम स्टिकर्स तयार करू शकतील. सध्या, ही सर्व वैशिष्ट्ये सर्व वापरकर्त्यांसाठी मोफत असतील की फक्त टेलिग्राम प्रीमियम वापरकर्त्यांनाच ही वैशिष्ट्ये मिळतील याबद्दल कोणतीही स्पष्ट माहिती नाही. अधिक माहितीसाठी, पुढील महिन्यात या वैशिष्ट्यांच्या लाँचची वाट पहावी लागेल.

## स्टारलिंक विरुद्ध भारतनेट

### सॅटेलाइट इंटरनेटच्या आगमनाने भारतनेट प्रकल्प संपेल का? दोन्हीचे फायदे आणि तोटे समजून घ्या

**एलोन मस्कची उपग्रह इंटरनेट सेवा स्टारलिंक भारतात आणली गेली तर ती इंटरनेट क्षेत्रात एक नवीन क्रांती ठरू शकते. तथापि, काही प्रश्न देखील उपस्थित केले जात आहेत. सरकार देशभरात फायबर इंटरनेट सेवा पसरवू इच्छित असलेल्या भारतनेट प्रकल्पाचे काय होईल असा प्रश्न विचारला जात आहे. भारतनेटचे मॉडेल बदलून फायबरसह सॅटेलाइट इंटरनेटचा समावेश केला जाईल की उपग्रह भारतनेट प्रकल्पाला गिळंकृत करेल असा प्रश्न देखील विचारला जात आहे. काही कंपन्यांचा असा विश्वास आहे की भारतनेट फक्त फायबरवर चालू शकते.**






### सॅटेलाइट इंटरनेटचे फायदे आणि तोटे

देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात इंटरनेट पुरवण्यासाठी सॅटेलाइट इंटरनेटचा वापर केला जाऊ शकतो. जरी १० कुटुंबे गावात राहत असली आणि त्यांना इंटरनेटची आवश्यकता असली तरी, हे सॅटेलाइट इंटरनेटद्वारे केले जाऊ शकते. वादळ, पाऊस किंवा खराब हवामानातही सॅटेलाइट इंटरनेट काम करते. पण त्याची किंमत जास्त आहे. अलिकडेच बांगलादेशात ही सेवा दरमहा किमान ३,००० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. त्यात इन्स्टॉलेशनचा खर्च समाविष्ट नाही, ज्यासाठी सुमारे ३५,००० रुपये खर्च करावे लागू शकतात. भारतात, जरी ती दरमहा ८१० रुपयांपर्यंत कमी केली गेली असली तरी, गरीब व्यक्ती इन्स्टॉलेशनचा खर्च कसा उचलेल हा एक मोठा प्रश्न आहे.

### तज्ञांचा विश्वास : भविष्यात मिश्र दृष्टिकोन

तज्ञांचा असा विश्वास आहे की भविष्यात मिश्र दृष्टिकोन दिसून येतो. भारतनेट आणि सॅटेलाइट इंटरनेट एकमेकांना पूरक म्हणून काम करू शकतात. ज्या ठिकाणी फायबर इंटरनेट पोहोचणे शक्य नाही, तेथे सॅटेलाइट इंटरनेट एक पर्याय बनू शकते. ह्यूजेस नेटवर्क सिस्टमचे अध्यक्ष प्रणव रौच यांनी सांगितले की सॅटेलाइट इंटरनेट आणि फायबर दोन्हीचे फायदे आहेत. दोन्ही एकत्र जाऊ शकतात. कारण दोन्ही आवश्यक आहेत. कमी डेटा आवश्यक असलेल्या दुर्गम भागात सॅटेलाइट इंटरनेटमध्ये गुंतवणूक करण्यावर सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे.

### फायबर आणि सॅटेलाइट इंटरनेटमधील फरक

फायबर इंटरनेट प्रामुख्याने फायबर केबलवर चालते. जिओ आणि एअरटेल या क्षेत्रातील प्रमुख कंपन्या आहेत आणि देशभरातील अनेक स्थानिक इंटरनेट सेवा प्रदाते देखील फायबर इंटरनेट प्रदान करतात. यामध्ये, फायबर केबलद्वारे घरांमध्ये इंटरनेट पोहोचवले जाते. ते राउटरशी जोडले जाते आणि नंतर एका विशिष्ट कव्हरेज क्षेत्रात वायरलेस इंटरनेट चालवता येते. सॅटेलाइट इंटरनेट याच्या अगदी उलट आहे. त्यात केबलची भूमिका नाही. सॅटेलाइट इंटरनेटचा पाया म्हणजे लो-अर्थ ऑर्बिटमध्ये असलेले टर्मिनल्स. हे टर्मिनल्स स्टारलिंक आणि वनवेब आणि अमेझॉनच्या प्रोजेक्ट कुइपर अंतर्गत अवकाशात पाठवण्यात आले आहेत. तिथून, टर्मिनल्स थेट पृथ्वीवर सिग्नल पाठवतात. ते सिग्नल एका छत्रीपर्यंत पोहोचतात ज्याला तुम्ही डीटीएच छत्री म्हणून विचार करू शकता. त्या छत्रीद्वारे, सिग्नल तुमच्या डिव्हाइसपर्यंत पोहोचतात आणि इंटरनेट काम करते.

### फायबर इंटरनेटचे फायदे आणि तोटे

फायबर इंटरनेट हा एक स्वस्त पर्याय म्हणून पाहिला जातो. त्यातून मिळणारा वेग साधारणपणे १ जीबीपीएस पर्यंत पोहोचू शकतो आणि लोकांना चांगला डाउनलोड आणि अपलोड स्पीड मिळतो. अनेक इंटरनेट कंपन्या ३९९ रुपयांना फायबर इंटरनेट देखील देत आहेत, ज्यामुळे तो सॅटेलाइट इंटरनेटपेक्षा खूपच स्वस्त पर्याय बनतो. तथापि, त्याची पोहोच देशभर नाही. वादळात केबल तुटल्यामुळे इंटरनेट खंडित होते.

## जिओ, एअरटेल की व्हीआय... सिम खरेदी करण्यापूर्वी ५ जी नेटवर्क येतेय जाणून घ्या...

**टेलिकॉम कंपन्यांनी त्यांचे नेटवर्क देशभर पसरवले आहे. जिओ, एअरटेल, बीएसएनएल आणि व्हीआय (वोडाफोन-आयडिया) हे त्यांच्या नेटवर्क कव्हरेजबद्दल विविध दावे करतात. ५ जी नेटवर्कबाबत एअरटेल आणि जिओमध्ये खूप स्पर्धा आहे. VI नेही या शर्यतीत प्रवेश केला आहे. त्यांनी अनेक शहरांमध्ये 5G सेवा सुरू केल्या आहेत. देशात अद्याप BSNL 5G लाँच झालेले नाही. 5G नेटवर्कबद्दल, लोक अनेकदा विचारतात की त्यांच्या क्षेत्रात 5G येत आहे की नाही हे कसे शोधायचे. मोबाइल कंपन्यांनी ही समस्या खूप सोपी केली आहे. जर तुमच्याकडे 5G स्मार्टफोन असेल आणि तुम्हाला जाणून घ्यायचे असेल की कोणत्या मोबाइल कंपनीचे 5G नेटवर्क तुमच्या क्षेत्रात सर्वोत्तम आहे, तर तुम्ही घरी बसून तुमच्या फोन-लॅपटॉपद्वारे हे शोधू शकता. तुम्ही मोबाइल कंपनीच्या वेबसाइट किंवा ॲपला भेट देऊन नेटवर्क कव्हरेज तपासू शकता किंवा तुम्ही सामान्य वेबसाइटवर शोधू शकता. आम्ही तुम्हाला हे करण्याचा एक सोपा मार्ग सांगत आहोत.**

- तुमच्या क्षेत्रातील 5G मोबाइल कव्हरेजबद्दल माहितीसाठी, तुम्ही nPerf.com ला भेट देऊ शकता. तुम्ही गुगलवर हे टाइप करताच, तुम्ही वेबसाइटवर पोहोचाल. त्यानंतर, तुम्ही https://www.nperf.com/en/map/IN/-/-/signal या लिंकवर क्लिक करून थेट 5G नेटवर्क कव्हरेज तपासू शकता.
- जर तुम्हाला nPerf.com ला भेट द्यायची नसेल, तर तुम्ही थेट नेटवर्क ऑपरेटरकडून देखील माहिती मिळवू शकता. क्रोम ब्राउझरवर जा आणि टाइप करा - जिओ नेटवर्क कव्हरेज मॅप. तुम्हाला जिओच्या वेबसाइटची लिंक मिळेल, जिथे तुम्ही तुमच्या शहरातील कव्हरेज तपशील पाहू शकता. हे तुम्हाला नवीन ५जी सिम मिळविण्यासाठी योग्य मार्गदर्शक देईल.




### नेटवर्क तपासण्यासाठी या पायऱ्या फॉलो करा...

- पायरी १ : https://www.nperf.com/en/map/IN/-/-/signal?ll=20&lg=0&zoom=3 वर क्लिक करा.
- पायरी २ : वेबसाइट इंटरफेस तुमच्या समोर उघडेल, त्यातून तुमचा कॅरियर निवडा जसे की Jio, Airtel इ.
- पायरी ३ : समजा तुम्ही Airtel निवडले. कंपनीचा कव्हरेज मॅप तुमच्या समोर उघडेल.




- पायरी ४ : तुम्हाला नकाशात रंगीत ठिपके दिसतील. खाली पाहिल्यास, कोणता रंग कोणत्या नेटवर्कचे प्रतिनिधित्व करतो हे तुम्हाला कळेल. उदाहरणार्थ, जांभळा रंग 5G नेटवर्क दर्शवितो.
- पायरी ५ : तुम्हाला नकाशाजवळ शोध पर्याय मिळेल. तेथे तुमच्या शहराचे, गावाचे, शहराचे नाव टाइप करा.
- पायरी ६ : तुम्ही शहराचे नाव टाइप करताच, तुम्हाला त्या क्षेत्रातील नेटवर्कची माहिती मिळेल. तुम्हाला कळेल की त्या क्षेत्रात 4G नेटवर्क येत आहे की 5G.
- पायरी ५ : नेटवर्क ऑपरेटर देखील माहिती प्रदान करतो.

## फोन हँग होतोय? हॅकिंगची भीती!

**आजकाल सायबर गुन्हे इतके वाढले आहेत की लोक दररोज या गुन्ह्यांचे बळी पडत आहेत. सायबर गुन्हेगारांसाठी लोकांना लक्ष्य करण्याचा स्मार्टफोन हा सर्वात सोपा मार्ग बनला आहे. सायबर गुन्हेगारांच्या पद्धती इतक्या प्रगत झाल्या आहेत की लोकांना कळतही नाही आणि त्यांचा फोन हॅक होतो. या समस्येला तोंड देण्याचा कोणताही एक मार्ग नाही. सहसा लोकांना त्यांचा फोन हॅक झाल्याचेही कळत नाही. गृह मंत्रालयाच्या वतीने तज्ञ अमित कुमार यांनी काही सूचना दिल्या आहेत. अमित कुमार यांनी हॅक झालेल्या फोनची सामान्य लक्षणे सांगितली आहेत. यासोबतच, फोन हॅक झाल्यास येणाऱ्या समस्यांना कसे तोंड द्यावे हे देखील त्यांनी शिकवले आहे.**

- कसे तपासायचे? : अमित कुमार यांनी सांगितले की जर एखाद्या वापरकर्त्याला त्याचा फोन हॅक झाला आहे किंवा कॉल फॉरवर्ड झाला आहे असा संशय असेल तर तो फोनवरूनच शोधता येतो. तुमच्या फोनचा डायलर उघडा. कॉल ॲपवर जाऊन डायलरचा पर्याय सापडतो. तुम्हाला *#67# डायल करावे लागेल. तुम्ही डायल करताच, फोन स्क्रीनवर एक संपूर्ण यादी दिसेल. तुमचा कॉल फॉरवर्ड होत आहे की नाही हे ते सांगेल.
- कॉल-डेटा फॉरवर्ड होत असल्यास काय करावे? : अमित कुमार यांनी सांगितले की *#67# डायल केल्यानंतर तुमचा कॉल किंवा डेटा फॉरवर्ड होत असल्याचे आढळल्यास, ते थांबवण्यासाठी तुमच्या फोनच्या डायलरकडे परत जा. ##००२# डायल करा. हा कोड डायल करताच, तुमचे सर्व कॉल अनफॉरवर्ड होतील आणि डेटा देखील सुरक्षित राहील. तुमचे मेसेज देखील फॉरवर्ड केले जाणार नाहीत. म्हणून जर तुम्हाला तुमचा फोन हॅक झाला असेल किंवा कॉल फॉरवर्ड केला जाऊ शकतो असा संशय असेल, तर अमित कुमार यांनी सांगितलेली युक्ती वापरून पहा.



# धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस बरसला

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात मागील २४ तासांमध्ये ३० मे रोजी सकाळपर्यंत धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस झाला आहे. तर बीड २४ मिमी, जालना १३.९ मिमी, सोलापूर १२.१ मिमी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.



राज्यात गुरुवारपासून ३० मे रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमिटरमध्ये) : रायगड ०.३, रत्नागिरी ३.९, सिंधुदुर्ग ११.२, पालघर ०.१, नाशिक ०.६, धुळे ०.४, जळगाव ०.१, अहिल्यानगर ०.५, सोलापूर १२.१, सातारा १, सांगली ०.९, कोल्हापूर ०.८, छत्रपती संभाजीनगर ०.६, जालना १३.९, बीड २४, लातूर ५.१, धाराशिव ४२.२, नांदेड ९.३, परभणी ३, हिंगोली ०.२, बुलढाणा २.२, अकोला ०.१, वाशिम ०.२, अमरावती ३.४, यवतमाळ ६.५, वर्धा ८.७, नागपूर १.४, भंडारा ०.७, गोंदिया ३.९, चंद्रपूर १.२ आणि गडचिरोली २.५.

धाराशिव जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले. मात्र पावसामुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

सिधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटात रस्त्यावर दरड कोसळली. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकाने रस्त्यावरील कोसळलेली दरड हटवली असून या मार्गावर वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

महाड येथील इंडो अमाइनस या कंपनीमध्ये वायू गळतीमुळे एक कामगार जखमी झाला आहे. सध्या वायू गळती बंद असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सांगण्यात आले.

दि.२९ मे रोजी ठाणे जिल्ह्यात रस्ता अपघात घटनेत एक व्यक्ती, नांदेड जिल्ह्यात पाण्यात बुडून दोन व्यक्ती मृत झाल्या आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात भिंत पडून चार व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

राज्यात सर्व जिल्ह्यात पावसाची नोंद झालेली आहे. सद्यस्थितीत परिस्थिती नियंत्रणात असून कुठेही पूरपरिस्थिती उद्भवलेली नाही. राज्य आपत्कालीन कार्य केंद्र सर्व जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रांच्या सातत्याने संपर्कात आहे. पूरपरिस्थितीबाबत उपाययोजना म्हणून प्रशासनातर्फे 'एनडीआरएफ' व 'एसडीआरएफ' पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सांगण्यात आले.

# वरिष्ठ अभियंत्याच्या घरावर दक्षता विभागाची धाड; २ कोटी रूपये जप्त

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – ओडिशात भ्रष्टाचाराचं आणखी एक धक्कादायक प्रकरण उजेडात आलं आहे. ओडिशाच्या दक्षता विभागाने छापा टाकण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पाहून एका वरिष्ठ अभियंत्यानं घाबरून खिडकीतून नोटांचे बंडलं खाली फेकले. या अभियंत्याशी संबंधित अनेक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. त्याच्या दोन निवासस्थानांमध्ये तब्बल २ कोटींपेक्षा अधिक रोख रक्कम आढळली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात रोकड असल्यामुळे, ती मोजण्यासाठी अधिकाऱ्यांना नोटा मोजण्याची यंत्रे आणावी लागली आहे. या कारवाईमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.





ओडिशाच्या दक्षता विभागाने शुक्रवारी भुवनेश्वर आणि अंगुल येथे छापे टाकले. या कारवाईदरम्यान एका सरकारी अधिकाऱ्याच्या घरातून २.१ कोटींपेक्षा अधिक रोकड जप्त करण्यात आली.

भुवनेश्वर रोडवेज विभागाचे मुख्य अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांच्याशी संबंधित विविध ठिकाणांवर एकाच वेळी धाडसत्र राबवण्यात आले. भुवनेश्वरमधील पीडीएन एक्झॉटिका इमारतीतील त्यांच्या फ्लॅटमध्ये १ कोटी रुपये सापडले, तर अंगुलमधील दुसऱ्या फ्लॅटमध्ये १.१ कोटी रुपये आढळून आले.

दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांना पाहताच, बैकुंठनाथ सारंगी यांनी त्यांच्या फ्लॅटच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांची बंडलं खाली फेकली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, खिडकीतून फेकलेल्या या नोटा दक्षता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतल्या. उत्पन्नाच्या तुलनेत अधिक संपत्ती जमा केल्याप्रकरणी सारंगी यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईसाठी ओडिशा दक्षता विभागाचे ८ उपअधीक्षक (डीएसपी), १२ निरीक्षक, ६ सहाय्यक निरीक्षक आणि इतर कर्मचारी सहभागी होते. भुवनेश्वर, अंगुल आणि पीपली येथील सारंगी यांच्याशी संबंधित ७ ठिकाणांवर एकाचवेळी छापे टाकण्यात आले. अंगुलच्या विशेष दक्षता न्यायाधीशांनी सर्च वॉरंट जारी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, बैकुंठनाथ सारंगी केवळ दोन दिवसांनंतर सेवानिवृत्त होणार होते. त्यांच्या कार्यालयातही सध्या शोधमोहीम सुरू आहे. ही कारवाई केवळ प्रारंभिक टप्प्यात असून छापेमारी अद्याप पूर्ण झालेली नाही, अशी माहिती दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. सारंगी यांच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात येत आहे. त्याच आधारे पुढील कारवाई केली जाणार आहे.

# भारत निवडणूक आयोगाकडून चार राज्यांतील ३७३ मतदार अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण

**मुंबई (प्रतिनिधी)** – भारत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी ॲण्ड इलेक्शन मॅनेजमेंट नवी दिल्ली येथे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षकांसाठीच्या आठव्या तुकडीचे प्रशिक्षण सुरु झाले. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमातील छत्तीसगड, हरियाणा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश येथील बीएलओ, पर्यवेक्षक आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना संबोधित केले.

आयआयआयडीईएम येथे आतापर्यंतच्या सर्वांत मोठ्या प्रशिक्षण बॅचमध्ये एकूण ३७३ अधिकारी सहभागी झाले. यामध्ये उत्तर प्रदेशमधून ११८, मध्य प्रदेशमधून १३०, छत्तीसगडमधून ९६ आणि हरियाणामधून २९ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. दोन महिन्यांत, दिल्ली येथे एकूण ३,७२० फील्ड अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण ईसीअय मार्फत घेण्यात आले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले की, हे प्रशिक्षण अत्यावश्यक असून, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० व १९५१, मतदार नोंदणी नियम १९६०, निवडणूक आचारसंहिता नियम १९६१ आणि वेळोवेळी आयोगाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांनुसार निवडणुका पार पाडण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

या प्रशिक्षणाद्वारे सहभागी अधिकारी अंतिम मतदार यादी प्रकाशित झाल्यानंतर जिल्हाधिकारी/कार्यकारी दंडाधिकारी (कलम २४(अ) लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५०) व राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य निवडणूक अधिकारी (कलम २४(ब)) यांच्याकडे पहिल्या व दुसऱ्या अपीलच्या तरतुदींची माहिती मिळवतील. तसेच, बीएलओ व पर्यवेक्षकांनी फिल्डमध्ये काम करताना मतदारांनाही या तरतुदींची जाणीव करून द्यावी, असेही आवाहन त्यांनी केले.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमनंतर दि. ६ ते १० जानेवारी २०२५ दरम्यान छत्तीसगड, हरियाणा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमधून एकही अपील दाखल झालेले नाही.

या प्रशिक्षणाचा उद्देश सहभागी अधिकाऱ्यांना मतदार नोंदणी, अर्ज प्रक्रियेचे व्यवस्थापन आणि फिल्डमध्ये निवडणूक प्रक्रियेची अंमलबजावणी याबाबत व्यावहारिक ज्ञान देणे आहे. त्यांना माहिती व तंत्रज्ञान साधनांचा वापर, तसेच ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रणांचे तांत्रिक प्रात्यक्षिक आणि मॉक पोल्सच्या माध्यमातून प्रशिक्षणही दिले जाणार आहे, असे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकानुसार कळविले आहे.

# नीट–पीजी परीक्षा एकाच शिफ्टमध्ये होणार; सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – नीट पीजी २०२५ परीक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय घेतला आहे. देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा एकाच शिफ्टमध्ये घेतली जाणार आहे. कोर्टाने स्पष्टपणे म्हटलं आहे की, परीक्षा एकाच सत्रात घेण्यात यावी, जेणेकरून पारदर्शकता टिकेल आणि सर्व उमेदवारांना समान संधी उपलब्ध होईल. नीट पीजी परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्यासंदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, त्या सुनावणीदरम्यान कोर्टाने ती मागणी फेटाळून लावत एकाच शिफ्टमध्ये परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. या निर्णयानंतर नीट पीजी २०२५ ची परीक्षा १५ जून रोजी देशभरात एकाच सत्रात पार पडणार आहे.



यावेळी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे आपली भूमिका मांडली आहे. दोन सत्रांमध्ये परीक्षा घेतल्यास प्रश्नपत्रिकांच्या कठीणतेच्या स्तरात भिन्नता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे असमानता आणि मनमानीची शक्यता वाढते, असे निरीक्षण कोर्टाने नोंदवले आहे.

कोणत्याही दोन प्रश्नपत्रिका अचूकपणे एकसमान कठीणतेच्या असतील, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे सर्व उमेदवारांसाठी समान निकष आणि संधी सुनिश्चित करण्यासाठी परीक्षा एकाच सत्रात घेणे आवश्यक आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, १५ जून रोजी होणाऱ्या NEET-PG २०२५ परीक्षेसाठी आवश्यक तयारी करण्यासाठी अजूनही वेळ उपलब्ध आहे, असे स्पष्टपणे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. परीक्षेसाठी केंद्र निश्चित करण्यासाठी परीक्षा मंडळाकडे पुरेसा वेळ आहे, असेही कोर्टाने नमूद केले. त्यामुळे परीक्षा दोन सत्रांमध्ये होण्याच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे.

NEET PG परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना एक्झाम सिटी स्लिप २ जून २०२५ रोजी मिळणार आहे. ही सिटी स्लिप अधिकृत संकेतस्थळावर अपलोड केली जाणार नाही. राष्ट्रीय आयुर्विज्ञान परीक्षा मंडळ उमेदवारांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर सिटी स्लिप पाठवणार आहे. उमेदवारांनी ती स्लिप तिथून डाऊनलोड करून घ्यावी.

परीक्षेच्या चार दिवस आधी ॲडमिट कार्ड अधिकृत वेबसाइट natboard.edu.in वर उपलब्ध करून दिले जाईल. अर्ज क्रमांक आणि जन्मतारीख वापरून उमेदवारांना ते डाऊनलोड करता येईल. हॉल तिकीटाशिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही, हे सर्व उमेदवारांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र बनले परकीय गुंतवणूकदारांची पहिली पसंती

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राने पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत देशात आघाडी घेतली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १ लाख ६४ हजार ८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४ लाख २१ हजार ९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

गत आर्थिक वर्षात शेवटच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे.

हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांतच पार झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# ६ कोटींचे बक्षीस असलेल्या खतरनाक नक्षलवाद्याला बेड्या

**कोरापुट (प्रतिनिधी)** – केंद्र सरकारकडून देशभरातील विविध राज्यांमध्ये नक्षलवाद विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. नक्षलवाद समूळ नष्ट करण्याचे सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील तसे संकेत दिले आहेत. यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये नक्षलवाद विरोधात स्पेशल ऑपरेशन सुरु आहे. या ऑपरेशनमधून अनेक नक्षलवाद्यांचा खात्मा केला जातोय. तर काही ठिकाणी नक्षलवाद्यांना अटक केली जात आहे. सुरक्षा दलांनी अशाच प्रकारची मोठी कारवाई शुक्रवारी केली आहे. पोलिसांनी तब्बल ६ कोटींचे बक्षीस असलेला कुख्यात नक्षलवादी हिडमा याला बेड्या ठोकल्या आहेत.

सुरक्षा दलांची नक्षलवादाविरोधात मोठी कारवाई सुरु आहे. या कारवाईत सुरक्षा दलांना सर्वात मोठं यश आलं आहे. कारण तब्बल ६ कोटींचे बक्षीस असणाऱ्या कुख्यात नक्षलवादी हिडमाला याला अटक करण्यात आली आहे. ओडिशा पोलिसांनी ही मोठी कारवाई केली आहे. ओडिशाच्या कोरापूर जिल्ह्यातून हिडमाला अटक करण्यात आली आहे. हिडमाकडून एके-४७ रायफल आणि ३५ काडतूसं देखील जप्त करण्यात आली आहेत.




पोलिसांच्या या कारवाईने ओडिशा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशच्या सीमाभागात सक्रिय असलेल्या नक्षलवाद्यांच्या नेटवर्कला मोठा दणका बसला आहे. कुख्यात नक्षलवादी कुंजाम हिडमा उर्फ मोहन याला कोरापूट पोलीस आणि डिस्ट्रिक्ट वॉलंट्री फोर्स यांच्या संयुक्त विद्यमाने ही कारवाई करण्यात आली आहे. कोरापूट जिल्ह्यातील हाइपारीगुडा पोलीस ठाणे हद्दीत पेटगुडा जंगलात हिडमा याच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत.

हिडमा हा महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया येथील नक्षलग्रस्त भागात नक्षली कारवायांमध्ये सक्रिय होता, अशी माहिती आहे. त्याच्याकडे स्फोटकं सापडली आहेत. पोलिसांनी त्याच्याकडून एके-४७ रायफल, ३५ जिवंत काडतुसे, ११७ डेटोनेटर, गनपावडर, रेडिओ, चाकू आणि इतर साहित्य जप्त केले. पोलिसांकडून या प्रकरणी सखोल तपास सुरु आहे.

नक्षलवादाविरोधात सुरक्षा दलांचं सुरु असलेलं ऑपरेशन आगामी काळातही सुरू राहणार आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहिर प्रगटन द्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, संस्थेचा सभासद श्रीमती सरजितकौर रनबीरसिंग खोकर यांचा प्लॉट सर्वे नं. ८०, प्लॉट ३१, ज्याची चतुसीमा पूर्वेस रोड, पश्चिमेस प्लॉट नं. २७, दक्षिणेस प्लॉट नं. ३०, उत्तरेस प्लॉट नं. ३२, असून याचे क्षेत्रफळ ६०४०=२४०० असून हा प्लॉट श्रीमती गुरमितकौर जगमिर सिग घुमान यांच्या नावे हस्तांतर करण्यासाठी संबंधितांनी संस्थेकडे भर्ज केलेला माहे. तरी वरिल प्लॉट बाबद कुणास काही आक्षेप उजा मालकी हक्क देवाण – घेवाण, कर्ज गहाण खत इ. असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत संस्थेकडे लेखी कागदपत्रासह आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यानंतर कोणाचेही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही म्हणून नंदीग्राम सहकारी गृह निर्माण संख्या म. नांदेड सादर करीत आहे.

**अध्यक्ष।सचिव**
**नंदीग्राम सहकारी गृहनिर्माण संस्था**
**म. नांदेड १९/०५/२०२५**


# महाराष्ट्रातील बंदर विकासाच्या ४२ प्रकल्पांना केंद्रीय मान्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील बंदर विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या ४२ प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून मंजुरी मिळाली आहे. उर्वरित १३ प्रकल्प तातडीने मंजूर करावेत, अशी मागणी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे केली आहे.

केंद्रीय पर्यावरण विभागाकडे महाराष्ट्रातील बंदरे विकास मंत्रालयाच्या विविध विकास कामांच्या प्रलंबित परवानगी तातडीने मंजुरी देण्याबाबत बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची भेट घेतली.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





## टी. सी. हरवली

माझी राजू मरिबा छापेवाड या नावाची वर्ग ५ वी पास ची टि.सी.व मुळ कागदपत्रे तरोडा ते कल्याणनगरटो प्रवास दरम्यान हरवली आहे. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता. राजू छापेवाड ४१, पुर्णा रोड राज कॉर्नर जवळ कल्याणनगर नांदेड मो. ७६६६६९८६६३**


## एनडीआरएफ, एसडीआरएफ पथकं सतर्क

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात आपत्ती परिस्थितीत मदत व बचाव कार्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकं सतर्क आहेत. मुंबई शहर व उपनगर मध्ये एनडीआरएफची तीन पथके, पालघर मध्ये एक, नागपूर येथे दोन पथके तैनात आहेत. तर पुणे मुख्यालय येथे एनडीआरएफची दोन पथके राखीव ठेवण्यात आली आहेत. नागपूर व धुळे येथे एसडीआरएफची प्रत्येकी दोन पथके तैनात असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्य केंद्राकडून देण्यात आली. राज्यात मागील २४ तासांमध्ये (२९ मी रोजी सकाळपर्यंत) मुंबई उपनगरात सर्वाधिक ३५.२ मिमी पाऊस झाला आहे. मुंबई २९.८ मिमी, ठाणे २९.५ मिमी, नाशिक २६.३ मिमी आणि रायगड जिल्ह्यात २१.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.


## उपअधिक्षक भूमि अभिलेख,नांदेड यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालय परिसर बचत भवन जवळ नांदेड ता.जि.नांदेड
दुरध्वनी क्र.(०२४६२)२३४०३९ ई मेल dyslrnanded@yahoo.in

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मौजे नांदेड ता.जि.नांदेड येथील मिळकत ज्याचा न.भू.क्र.१३६८१ असून या मिळकतीचे धारक कै.गणपती भूजंग घुसे हे दिनांक १२/४/२००६ रोजी मयत झालेले असून त्यांचे वारसदार खालील प्रमाणे असल्याबाबतचे शपथपत्र/ अर्ज सादर केले आहे.

| अ.क्र. | नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ | संभाजी गणपतराव घुसे | मुलगा |
| २ | भुजंगराव गणपतराव घुसे | मुलगा |
| ३ | सखाराम गणपतराव घुसे | मुलगा |
| ४ | किशन गणपतराव घुसे | मुलगा |

सदरील मिळकत वारसा हक्क कायद्याप्रमाणे वरील वारसदारांच्या नावे सदर मिळकतीचे नामांतरणकामी उप अधिक्षक भूमि अभिलेख नांदेड कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरचे मिळकतीत कोणाचा हक्क अथवा उजर असेल तर त्यांनी १५ दिवसांचे आत आपले आक्षेप वरील दर्शविलेल्या कार्यालयात नोंदवावे.सदर प्रकरणी मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरील मिळकत वारसा अधारे अर्जदार यांचे नावे नामातंर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**उप अधिक्षक भुमि अभिलेख**
**नांदेड**



## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सटवा लक्ष्मण सुर्यवंशी यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-१३६ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर - मालमत्ता नं.-बी-५१४ नविन वार्ड नं.- १६ नविन मालमत्ता नं.- ८१९/१ साईज पुर्व -पश्चिम ९.१४ मी दक्षिणी उत्तर १२.१९ मी चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १५२, पश्चिम: प्लॉट नंबर १५०, दक्षिण : प्लॉट नंबर १८८, उत्तर :६.१० मी.रस्ता नागोराव चंदर सुर्यवंशी यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खतअधारे वारसा अधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचेही काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदखताच्या अधारे त्याच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोदवहीत घेण्यात येईल याची नोंद घ्यावी

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**



## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,जयश्री बालाजीराव दुगाडे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-गट.नं.-२९९ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर - मालमत्ता नं.-४५२/६२ नविन वार्ड नं.- १६ नविन मालमत्ता नं.- ७४७/६२ साईज पुर्व -पश्चिम ९.१४ मी दक्षिणी उत्तर १२.१९ मी चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर २२, पश्चिम: ३० फुटाचा रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर २८, उत्तर :२० फुटाचा रस्ता जगदिश विष्णूदास तोष्णीवाल यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खतअधारे वारसा अधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचेही काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदखताच्या अधारे त्याच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोदवहीत घेण्यात येईल याची नोंद घ्यावी

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**



## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सुशिलाबाई राजाराम राजरपलक यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-गट.नं.-४०२ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -१३ मालमत्ता नं.-ई ५३०/१७ नविन वार्ड नं.- १० नविन मालमत्ता नं.- २७९०/२७ साईज पुर्व -पश्चिम ४० फुट दक्षिणी उत्तर ३० फुट चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १७, पश्चिम: ६.१० मी. रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर १२, उत्तर :प्लॉट नंबर १४ बसवेश्वर नारायणराव दंडवे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खतअधारे वारसा अधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचेही काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदखताच्या अधारे त्याच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोदवहीत घेण्यात येईल याची नोंद घ्यावी

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**



## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,रोहीदास लालसिंग पवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-गट.नं.-४६ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -१० मालमत्ता नं.-सी ९०८/९ नविन वार्ड नं.-१ नविन मालमत्ता नं.- ४०८६/९ साईज पुर्व -पश्चिम ४० फुट दक्षिण उत्तर ३० फुट चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ४, पश्चिम: ६.१० मी. रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर ११, उत्तर :प्लॉट नंबर ९ मारोती गणपतराव गोरठकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खतअधारे वारसा अधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचेही काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदखताच्या अधारे त्याच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोदवहीत घेण्यात येईल याची नोंद घ्यावी

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## कार्यालयीन कामकाजात कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर कार्यशाळेस प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** कार्यालयीन कामकाजात उत्कृष्टता येण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, याविषयावर नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस महाराष्ट्र ज्ञान महामंडळांच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.



जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या निर्देशानुसार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार ३० मे रोजी डॉ.शंकरराव चव्हाण नियोजन भवन, मुख्य प्रेक्षागृहात कार्यालयीन कामकाजात कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी कार्यालयीन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा याअनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. पॉवर पॉइंट सादरीकरणाच्या माध्यमातून विविध उपयोजन व टूल्सचा दैनंदिन कामकाजात प्रत्यक्ष वापर कसा करावा याबाबत ओघवत्या संवाद शैलीत माहिती दिली.

प्रास्ताविक जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक नीरज धामनगावे तर आभार प्रदर्शन उपजिल्हाधिकारी रुपाली चौगुले यांनी केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी संजीव मोरे, राजकुमार माने, तहसिलदार शंकर लाड, विपीन पाटील, विकास बिरादार, प्रगती चोंडेकर, उपअधीक्षक भूमी अभिलेख बळवंत मस्के, नायब तहसिलदार भगवान हंबर्डे, मकरंद दिवाकर, उषा इज्जपवार, स्वप्निल दिगलवार, जिल्हा व्यवस्थापक पंढरीनाथ आघाव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख, नगरपालिका प्रशासन, नियोजन भवन, जिल्हा कोषागार कार्यालयातील सर्व संवर्गातील अधिकारी- कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## आ. चिखलीकर यांच्या हस्ते श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचे लोकार्पण



**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचे लोकार्पण सोहळा आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

आ.चिखलीकर यांनी 'सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके, शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते!' वडेपुरी (ता. लोहा) येथील भक्तांच्या नवसाला पावणारी प्रसिद्ध रत्नेश्वरी देवी मातेचे प्रसन्न, ऊर्जादाई, भक्तिमय वातावरणामध्ये मनोभावे आरती केली. देवी मातेचे आशीर्वाद घेतले व श्री रत्नेश्वरी देवी मंदिर महाद्वार कमानीचे लोकार्पण केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, आनंदराव पाटील शिंदे, मंडळ अध्यक्ष शिवाजीराव दळवे, किशनराव डफडे, शंकरराव ढगे, बळीराम कदम, साहेबराव काळे, बंडू काळे, काशिनाथ लामदाडे, माधवराव कदम, लक्ष्मणराव बोडके, चांदोजी दळवे, प्रकाश बोडके, गोपाळ सावळे, साहेबराव झांबरे, सदाशिव स्वामी, सुरेशराव देशमुख, संतोष कदम उपस्थित होते.

## बारूळ येथे वीज पडून पाच शेळ्या मृत्यूमुखी

**कंधार (प्रतिनिधी)–** गेल्या आठ दिवसांपासून बारूळ परिसरात ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाटासह संततधार पाऊस पडत असल्याने पेरणीपूर्व मशागतीची सर्व कामे खोळंबली आहेत. अशातच कोंडवाड्यावर वीज पडल्याने पाच गाभण शेळ्यांचा मृत्यू झाला.

सध्या शेतीत मशागतीच्या कामांना वेग आला आहे. शेतातील उन्हाळी ज्वारी, भुईमुंग, हळद काढणी शिल्लक असताना संततधार पावसामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. त्याचबरोबर आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात आला आहे. त्यातच गुरुवारी दि.२९ रोजी सायंकाळी वाऱ्यासह विजेचा कडकडाटासह पाऊस सुरू झाला. त्यातच बारूळ (ता.कंधार) येथील शेतमजूर शिवाजी महादू गायकवाड यांनी कोंडवाड्यात १० शेळ्या बांधल्या होत्या.

सायंकाळी साडेसात वाजता वीज पडल्याने पाच गाभण शेळ्या जगीच मृत्यू पावल्या. त्यामुळे शेतमजुराचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. शासनाने पंचनामा करून तातडीने मदत करावी अशी मागणी होत आहे.



**नांदेड :** वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आ. अमरनाथ राजूरकर, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, बी.आर. कदम, प्रवीण साले, चैतन्यबापू देशमुख, अमितसिंह तेहरा, पवनसिंह बैस, मोहनसिंह तौर, हुकूम ठाकूर, नारायण चौहान, भारतसिंह तोमर, महेश ठाकूर, सुषमा गाहेरवार, डॉ. पुनितासिंह रावत, विनया तेहरा, ज्ञानेश्वर चौहान, शोभा चौहान आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## आमदार आनंदराव बोंढारकर यांचा आज सोनखेडमध्ये जनता दरबार

**नांदेड (प्रतिनिधी )–** जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्या गावातच सोडवण्यासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ३१ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत सोनखेड येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे.

या जनता दरबार मध्ये ग्रामीण भागातील घरकुलांसह अनेक नागरिक समस्यांवर चर्चा करण्यात येणार आहे.यावेळी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाच्या सर्वच विभागांचे लोहा तालुक्यातील विभागप्रमुख प्रमुख उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी या जनता दरबारमध्ये सहभागी होऊन आपल्या अडचणी सोडवून घ्याव्यात, असे आवाहन आ. बोंढारकर यांच्या संपर्क कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## मारोतीराव पाटील यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील खतगाव येथील रहिवासी तथा पोलीस पाटील मारोतीराव हणमंतराव पाटील (वय ८५) यांचे



शुक्रवार दि. ३० मे रोजी दुपारी २.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मारोतीराव हणमंतराव पाटील यांच्या पार्थिवावर शनिवार दि. ३१ मे रोजी सकाळी १० वाजता खतगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन भाऊ सुभाष पाटील, नागनाथ पाटील, तीन मुली–सौ. ललिता बालाजीराव पाटील खतगावकर, सौ. पुष्पा बिराजदार, सौ. सुरेखा शिंदे, एक मुलगा बालाजी पाटील व नातू कपील पाटील, प्रसाद पाटील व सुना, जावई असा परिवार आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील खतगावकर यांचे ते सासरे होत.

## मनाठ्यात शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** मनाठा (ता. हदगाव) येथील कर्जबाजारी शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १९ ते २५ मेच्या दरम्यान उघडकीस आली.

मनाठा येथील शेतकरी सुभाष नारायण सोनाळे (वय ५०) यांच्या शेतात सततची नापिकी होत होती. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांनी बँकेचे कर्ज काढले. पण नापिकीमुळे कर्जाची परतफेड करू शकत नव्हते. अखेर त्यांनी शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी मनाठा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक कांबळे करत आहेत.

## खंजर बाळगणाऱ्या दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** हातात घातक शस्त्र बाळगून दहशत पसरविणाऱ्या आणि सार्वजनिक रस्त्यावर मद्यप्राशन करणाऱ्या गुन्हेगारांना रस्ता सुरक्षा पथकाद्वारे अटक करून त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम सुरू आहे. नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीतील दोघांना अटक करून त्यांच्याकडून खंजर जप्त केले आहे. ही कारवाई २९ मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास करण्यात आली.

नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनानुसार २९ मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास धनेगाव लातूर फाटा येथे गस्तीवरील रस्ते सुरक्षा पथकाने सुखविंदरसिंग मेजरसिंग राय (वय २५, रा. गुरुद्वारा गेट नंबर पाच, नांदेड) आणि प्रीतमसिंग दिलीपसिंग कामठेकर (वय २३ रा.कामठा गणपुर, हल्ली मुक्काम खालसा हॉटेलजवळ वजिराबाद, नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आले. पोलीस अंमलदार संघरत्न गायकवाड यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक कदम करत आहेत.

## शेतकऱ्याने २.७५ लाखांच्या दागिन्यांची पर्स केली परत

**अर्धापूर (प्रतिनिधी) –** खासगी काम घेवून पोलीस ठाण्यात जात असलेल्या बारसगाव येथील एका शेतकऱ्याला रस्त्यात २.७५ लाख रुपयांची सोन्याची दागिने असलेली पर्स सापडली. पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्या शेतकऱ्याला एक महिला नातेवाईकांसोबत चर्चा करीत होती. एवढ्यात शेतकऱ्याने एक पर्स माझ्या गाडीच्या डिक्कीत आहे. तीच आहे का, बघा असे सांगितले. त्यांना सोन्याचे दागिने दिसताच आनंद अश्रू आवरता आले नाहीत. ही घटना शुक्रवारी दि.३० रोजी चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे.



बारसगाव (ता.अर्धापूर) येथील शेतकरी गंगाधर नंदीअप्पा घुसे यांना एक नेकलेस १ लाख ६० हजार रुपये, दोन अंगठ्या १ लाख रुपये असा एकूण २ लाख ६० हजारांचा ऐवज असलेली पर्स अर्धापूर –लोणी रस्त्यावर मुंजा लावण्याच्या पुलावर सापडली. दरम्यान, दागिने हरवलेली नांदेड येथील माया मिलींद बुक्तरे ही महिला रडत बसली होती. काही वेळानंतर पर्स सापडलेले शेतकरी गंगाधर घुसे हे पोलीस ठाण्यात आले असता सदर बाब त्यांच्या लक्षात आली. त्याचक्षणी त्यांनी ती ऐवज असलेली पर्स त्यांना परत दिली. शेतकरी गंगाधर घुसे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## मुगट रेल्वे स्थानकाजवळ अनोळखी महिलेचा मृतदेह

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुगट रेल्वे स्थानकाजवळ एका अनोखळी महिलेचा मृतदेह प्रेत ३० मे रोजी सकाळी आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी बारड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक उत्तम बुक्तरे यांनी भेट दिली. सोशल मीडियाच्या माध्यमातून या महिलेच्या प्रेताविषयी माहिती देण्यात आली. त्यानंतर इतवारा पोलीस ठाण्यामध्ये सदर महिला हरवल्याची नोंद करण्यात आली होती. शबाना अंजुम शुकूर रा. देगलूर नाका गुलजारबाग नांदेड असे मृत महिलेचे नाव असून की वेडसर असल्याचे त्यांच्या वडिलांनी सांगितले. या प्रकरणी बारड पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्याविषयीची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com